सो. स्थापना: सन् 1928 सो. रजि. क्र.1308/1958-59

# बृहन्महाराष्ट्र मंडळ

(मध्यवर्ती संघटना, नवी दिल्ली)

दिलीप कुंभोजकर
प्रधान कार्यवाह

दिनांक 11/01/2022

## 71व्या वार्षिक अधिवेशन संबंधी महत्वाची सूचना

माननीय सभासदांस सप्रेम नमस्कार,

आपणांस माहित आहेच कि आगामी 29 व 30 जानेवारी 2022 ला बृहन्महाराष्ट्र मंडळाचे 71वे वार्षिक अधिवेशन इंदूर येथे नियोजित आहे. या अधिवेशन निमित्त विविध प्रांतातील अनेक सभासदांनी अधिवेशन करिता आपली नोंदणी केली आहे. तरी देशातील विविध प्रांतात सध्या कोरोना महामारीच्या रोज बिघडत चाललेल्या परिस्थितीवर मंडळाच्या कार्यकारिणीने विचार केला आणि येणाऱ्या अधिवेशन प्रतिनिधींच्या आरोग्यास संभाव्य धोका व त्या संबंधातील आशंका लक्षात घेवून दिनांक 29 व 30 जानेवारी 2022 ला अधिवेशनाचे आयोजन तूर्तास नाही करण्याचे ठरविले आहे. कोरोना महामारी संबंधातील एकूण परिस्थिती निवळल्यावर, यजमान संस्थेशी विचार विनिमय करून आणि तसंच नवीन तारखांना नव्याने शासकीय परवानगी घेवून लवकरच अधिवेशनाच्या नवीन तिथींची घोषणा करण्यात येईल. ज्या सभासदांनी नोंदणी केली आहे अधिवेशनाच्या नवीन तारखांकरिता आपले नोंदणी शुल्क जमा ठेवण्याचा किंवा परत घेण्याचा विकल्प देण्यात येत आहे. या संदर्भात नोंदणी केलेल्या सभासदांना लवकरच मंडळ प्रतिनिधी वेगळ्याने संपर्क करतील. दिनांक 30 जानेवारी 2022 ला निर्धारित निवडणूक अंतर्गत मतदान प्रक्रीये संदर्भात देखील परिस्थिती अनुरूप निर्णय घेण्यास निवडणूक अधिकारींना कार्यकारिणीच्या वतीनं विनंती करण्यात आली आहे.

समस्त सभासदांनी कृपया नोंद घ्यावी कि दिनांक 29 जानेवारी 2022 करिता अधिसूचित वार्षिक साधारण सभा पण समान कारणास्तव आयोजित होणार नाही आणि त्या संबंधीची नवीन तिथीची अधिसूचना पर्याप्त अवधीत नव्याने प्रसिद्ध केली जाईल.

धन्यवाद

आपला नम्र

**दिलीप कुंभोजकर**
**प्रधान कार्यवाह**

प्रधान कार्यवाह संपर्क : 'शाकंभरी', 19, सुधा विहार कॉलोनी, रामपूर, जबलपूर (म.प्र.) 482008,
मोबाईल : 9479639831, दूरध्वनी : 0761-2666253, ईमेल : dilipkumbhojkar@bmmindia.org.in
मंडळ संपर्क : 10056, मुलतानी ढान्ढा, गल्ली नं. 2, पहाड़गंज, नवी दिल्ली - 110055